स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास

अंतरविद्याशाखे अंतर्गत समाजकार्य विषयात पीएच. डी पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

क्रांती विठ्ठलराव भाटापूरकर

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

-: मार्गदर्शक :-

डॉ. प्रतिभा पी. लोखंडे.

जवाहरलाल नेहरू कॉलेज ऑफ सोशल वर्क सिडको, नांदेड.

जुले -२०२१

नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास

प्रस्तावना :

भारत हा तिसऱ्या जगातील विकसनशील देश असून २१ व्या शतकातील ' Elephant Economy ' च्या वर्तमानस्थितीवर दृष्टिक्षेप टाकला तर ' सफरींग इंडियातील आम आदमी ' भांडवली शिक्षण, कुपोषणग्रस्त आरोग्य, भौतिक व सांस्कृतिक दारिद्य, काम करण्याची तयारी असताना देखील वाट्याला आलेली बेरोजगारी, वाढत चाललेली भाववाढ, फोफावत चाललेला भ्रष्टाचार आणि तुटपुंज्या व तोकडी पायाभूत सुविधांच्या समस्येने अरिष्टग्रस्त आहे. यामुळेच देशातील आर्थिक व सामाजिक समस्या अतिउच्च शिखरावर जाऊन पोहचल्या आहेत आणि याच समस्यांच्या दृष्टचक्रातून निर्माण होणारे हिनफलित म्हणजे ' बालक समस्या ' होय. बालक समस्या म्हणजे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला कुंठीत करणारी समस्या आहे. कारण, ' अमर्त्य सेन ' यांच्या मते, मानव हा विकासाचा प्रतिनिधी (Agent), लाभार्थी आणि निर्णयकर्ता (Adjudicator) आहे. त्यामुळे त्यांच्या विकासाशिवाय कोणताही विकास शक्य नाही.तर भारताचे तत्कालीन पंतप्रधान ' पंडित जवाहरलाल नेहरू ' यांच्या मते, राष्ट्राच्या विकासात कारखाने व यंत्रसामुग्री अगोदर मानवी घटकांचे अत्यंत महत्व आहे. यातही मानवी घटक महत्वाचा मानला तर प्रौढ मानवी घटकाच्या विचाराआधी प्रथम अत्यंत महत्वाच्या " बालक घटकाचा विचार " करणे अगत्याचे आहे. सहाजिकच देशाच्या आर्थिक विकासासाठी किंवा विकासाला चालना देण्यासाठी, देशातील मानवी घटकांचा किंवा त्याअगोदर उद्याच्या उज्ज्वल भविष्याचा (बालकांचा) विकास होणे अभिप्रेरित आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने कोणत्याही राष्ट्राला जलद, चिरंतन व सर्वसमावेशक विकास साधता येईल. अन्यथा, उलट परिस्थिती राहिल्यास त्या देशाचा सर्वांगीण विकास मागास राहणार. हे शास्त्रीय सैद्धांतिक सत्य आहे. बालकांचा विकास देशाच्या विकासाशी जुडलेला आहे. हे सर्वश्रुत आहे. या संदर्भात भारताचे

न्यायमूर्ती ' पी.एन. भगवती ' असे म्हणतात, " The Child is a soul with a being, a nature and capacities of its own, who must be helped to find them, to grow into their maturity, into a fullness of physical and vital energy and the almost breath, depth and height of its emotional, intellectual and spiritual being ; otherwise there cannot be a healthy growth of the nation " अर्थात, " बालक म्हणजे चैतन्यपूर्ण आत्मा, स्वतःच्या क्षमता व नैसर्गिक प्रवृत्ती असलेला त्या ओळखण्यासाठी त्यांचा विकास करण्यासाठी फक्त त्याला साहाय्य करायला हवे ज्यामुळे तो शारीरिकदृष्ट्या परिपक्व होईल आणि आपली भावनिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकासाची सर्वोच्च पातळी गाठू शकेल हे साध्य झाले नाही तर देशाचा विकास होणे शक्य नाही. ' थोडक्यात, देशाच्या विकासासाठी गुणात्मकदृष्ट्या सक्षम बालकांची आवश्यकता आहे ; परंतु भारतातील बालकांच्या अनेक समस्येकडे पाहता, सद्याचा विकास हा फक्त संख्यात्मक किंवा वाटतो. कारण, बालकांच्या अनेक समस्यांपैकी कचरा गोळा करणारे महिला व बालकांच्या समस्या अतिशय जलदगतीने भीषण रूप धारण करून भारतासमोर मोठी समस्या म्हणून उभी आहे.

बालक व्याख्या :

जागतिक पातळीवर बालक कोणास म्हणावे याबाबतीत विचारवंतात एकमत आढळत नाही. बालकाचे स्वरुप व व्याप्तीनुसार त्याचा अर्थ वा व्याख्या करण्यात आल्या आहेत. " उदरनिर्वाहासाठी विविध क्षेत्रात मजुरी वा काम करणाऱ्या अल्पवयीन बालकांना सर्वसाधारणपणे बालक म्हटले जाते. ' बालकाच्या संदर्भात अनेक संस्थांनी व विचारवतांनी व्याख्या केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे

भारतीय राज्यघटना : " ज्या व्यक्तिंनी आपल्या वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली नाहीत. अशा सर्व कामगारांना बालक असे म्हणतात. '

जागतिक संगठनेने आयोजित केलेले अधिवेशन (convention) द्वारे निश्चित केलेल्या धोरणान्वये अठरा वर्षे वयोगटापर्यन्त सर्व व्यक्ती बालक म्हणून ओळखले जातील , यात राज्याचे सर्व रहिवासी , प्रवासी व स्थलांतरित बालकांचा समावेश राहिल .

महाराष्ट्र शासन राज्यकृती आराखडा : " बालक म्हणजे १४ वर्षाखालील शाळेत जाणारी अथवा न जाणारी आणि बालक कायद्यामध्ये नमूद केलेल्या किंवा नमूद न केलेल्या कामामध्ये पूर्णवेळ किंवा अर्धवेळ गुंतलेली सर्व मुले होय. '

उपरोक्त सर्व व्याख्येमधून असे स्पष्ट होते की, बालक म्हणजे अशा सर्व व्यक्ती ज्यांनी वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली नाहीत. अशा (चौदा वर्षाखालील) व्यक्तिची मजुरीकरिता नियुक्ती केल्यास तो बालक होतो, ही मजुरी वस्तू स्वरूपाने किंवा रोख स्वरूपातही असू शकते. भारतातील कचरा गोळा करणारे महिला व बालक समस्येमुळे देशाचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. कारण कोणताही महिला व बालक मानसिक, बौद्धिक व शारीरिकदृष्टया सक्षम नसेल तर त्याचा परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कुटुंब, समाज व पर्यायाने देशावर होतो. बालकांच्या मानसिक, बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या परिकल्पना अभ्यासल्यास त्याचा परिणाम स्पष्ट होईल.

नांदेड जिल्ह्यातील महिला व बालकांची व्याप्ती :

नांदेड जिल्ह्याच्या बाबतीत विचार केला तर नांदेड जिल्हा हा आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास आहे. मानवी विकासाच्या पातळीवर राज्यातील निवडक सर्वात दहा कमी मानव विकास निर्देशांकांमध्ये जिल्ह्यात नांदेड जिल्ह्याचा समावेश असून राज्यात मानव विकासाचा निर्देशांकामध्ये नांदेड जिल्ह्याचा २९ वा क्रमांक आहे.७८ तसेच नांदेड जिल्ह्यातील दारिद्र्याचे प्रमाण अभ्यासल्यास असे स्पष्ट होते की, नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तीन व्यक्तीपैकी

एक व्यक्ती दारिद्र्यात आहे. अर्थात, नांदेड जिल्ह्यातील दारिद्र्य ३३.४५ टक्के आहे आणि साक्षरतेचे प्रमाण ७४.९६ टक्के आहे. थोडक्यात, नांदेड जिल्ह्यातील मानव विकासाची परिस्थिती मागास आहे. कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची समस्या नांदेड जिल्ह्यात महाभयानक स्वरूपात अस्तित्वात आहे.

थोडक्यात, नांदेड जिल्ह्यातील गोळा करणाऱ्या महिला व बालकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे. आजच्या परिस्थितीत महिला व बालकांची संख्या निश्चितच वाढलेली असणार. यात तिळमात्र शंका नाही, म्हणजेच नांदेड जिल्ह्यात गोळा करणाऱ्या महिला व बालकांची समस्या अतिशय ज्वलंत व तीव्र आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या समस्येवर संशोधन होणे महत्त्वपूर्ण आहे.

महिला व आरोग्य :

सामाजिक आर्थिक परिस्थिती व त्याच्या जोडीला लिंगभेद यांचा परिणाम आरोग्याला ओझे , आरोग्यविषयक माहिती व सेवा मिळणे व अनारोग्याचे सामाजिक आर्थिक परिणाम या बाबींवर होतो . त्यामुळे आरोग्यविषयक बाबींमध्ये स्त्री व पुरुष यांच्यातील असमानता असण्याची कारणे हुडकणे अत्यावश्यक आहे ; ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेची पध्दती उभारणे तिची आखणी करणे सुलभ होईल . आरोग्य तसेच रोगांना प्रतिबंध यांत स्त्री व पुरुष तसेच मुले व मुली यातील फरक लक्षात घ्यायला हवा . ते समप्रमाणात केले तर ते प्रभावी होईल . लैंगिक संबंध व अपत्याला जन्म देणे अशा व्यक्तीगत हक्कांबाबत महिलांना व मुलींना बराच सापत्नभाव भोगावा लागत असल्याने सहन करावा लागत असल्यामुळे भारतात महिलांच्या समस्या विशेष करून महत्त्वाच्या ठरतात . तसेच शिक्षण , आरोग्य सुविधा व कुटुंब नियोजन अशा व्यक्तीगत सेवांच्या उपलब्धतेबाबतही हे घडते . घरातच असणारी असमानता सापत्नभाव यांचा परिणाम महिलांच्या दर्जावर होतो . भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० मध्ये स्पष्ट म्हटले आहे की , ' आरोग्य व पोषक आहार यांत महिलांचे सक्षमीकरण या बाबींचा समावेश

असून पुरक व्यूहरचनेचा तो एक भाग आहे . त्याचबरोबर स्त्री - पुरुष समानता व महिलांचे सबलीकरण हे शतकातील विकासाचे एक ध्येय असून या करारावर भारताने सही केली आहे . वेळेवर परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे हा महिलेचा हक्क आवश्यक मानवी हक्क आहे हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय करार तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांतील घोषण व इतर कायदेशीर बाबींनी हे मान्य केले आहे . परिस्थितीतील विविधता लक्षत घेता महिलांसाठीच्या आरोग्य सेवेत सुधारणा होण्यासाठी अनेक व्यापक उपायांची गरज आहे . शिक्षण , पोषक आहार , सुरक्षित वातावरण , आर्थिक स्त्रोत व निर्णय प्रक्रियेत सहभाग या किमान मानवी हक्कांची पूर्तता होते ते शक्य चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा मिळण्याच्या निम्म्या हक्काची हमी दिली जाते . व्यक्ती म्हणून आई म्हणून व तिच्या अपत्यांसाठी दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या हक्कावर ' महिला संवेदनशील दृष्टिकोनावर भर येतो . बाळंतपणाच्या काळात मातांचे मृत्यू किंवा बाळंतपणानंतर होणारे मृत्यू कमी करण्यासाठी व्यापक व्यूहरचनेचा हा भाग आहे व त्यासाठी सरकार आरोग्य प्रणाली व समाज यांच्यात भक्कम सहकार्याची गरज असते .

बालकांच्या समस्या :

बालकांवर अयोग्य वेळी अयोग्य कामे करण्याची वेळ त्यांच्यावर येते त्याचा परिणाम हा त्यांच्या शैक्षणिक व आरोग्य स्थितिवर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येते. लहान बालके हे कचरा गोळा करण्याचे काम करत असल्यामुळे त्यांना अणेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते. कचरा गोळा करत असल्यामुळे त्यांना शिक्षणा पासून वंचित राहावे लागते यामुळे ते वाममार्गाला लागतात ते नशेचे सेवन करतात त्यांना पुरेशे ऍन न मिळाल्यामुळे ते कुपोषित होतात, त्यांना श्वसनाचे आजार जडतात, वैद्यकीय कचरा गोळा करताना याना अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

संशोधन विषयाचे समस्यासूत्रण :

कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची समस्या ही विश्वव्यापी समस्या आहे. विकसित देशापेक्षा विकसनशील देशामध्ये या समस्येने भीषण रुप धारण केले आहे. समाजातील महिला व बालकांच्या समस्येचे गांभीर्य ओळखून या समस्येकडे सर्व जगाचे लक्ष वेधून घेऊन त्यांना ही समस्या सोडविण्यासाठी तसे कृतिप्रवण करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने १९७० हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले आणि १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले. त्यानंतरच खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या या घटकाकडे न्यायाधीश, संसद सदस्य, सामाजिक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, अर्थतज्ज्ञ, प्रशासक आदिंचे लक्ष वेधले गेले. म्हणजे ही समस्या आता सार्वजनिक व्यासपीठ, चर्चा, परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा या क्षेत्रापुरती मर्यादित न राहता त्या देशाचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायालयापर्यंत जाऊन पोहचली आहे. परंतु, दुर्दैवाने घटनात्मक तरतूद, कायद्याचे अस्तित्त्व, शासनाच्या विविध योजना आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न असताना देखील आजही या घटका समस्या ज्वलंत व भीषण रूप धारण करून अस्तित्वात आहे. ती अजूनही सुटलेली नाही. त्यामुळेच ही समस्या जास्तच जटील होत चालली आहे. म्हणून या समस्येच्या निर्मूलनासाठी शासन व प्रशासनाची भूमिका अनुकूलरित्या प्रभावी असणे आवश्यक आहे. कारण, शासन व प्रशासनाच्या कार्यक्षमपणामुळेच बालक समस्येचे निर्मूलन होऊ शकते. सर्वसाधारणत : देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भौतिक भांडवलाबरोबरच गुणात्मक मानवी भांडवलाची आवश्यकता आहे. या मानवी घटकात बालकांचाही समावेश होतो. त्यामुळे बालकांचा विकास होणे आवश्यक आहे. परंतु देशातील उद्याचे भविष्य हे अंधकारम बालकामगारावर होणाऱ्या परिणामामुळे देशातील सामाजिक, आर्थिक व भौतिक मूल्य विरहित होत आहे. त्यामुळे गोळा करणाऱ्या बालकावर अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याकरीता कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची सामाजिक व आर्थिक स्थिती कशी आहे ? महिला व बालकांच्या आरोग्यावर काय परिणाम होतो? नेमके कचरा गोळा करणाऱ्या बालक निर्मितीचे प्रमुख कारण काय ? व यामुळे त्यांच्या जीवनावर काय परिणाम होतो ? तसेच शासन,

प्रशासन व न्यायालय, बालक निर्मूलनासाठी कार्यदक्ष असूनदेखील कचरा गोळा करणाऱ्या बालकाची निर्मिती का होते ? या सर्व प्रश्नांतून उपस्थित होणाऱ्या समस्यांमुळे प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य आहे. भारतात महाराष्ट्राचा मानवी विकासात चौथा क्रमांक लागतो. शिक्षणाच्या बाबतीतही महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे. परंतु याच महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची संख्या जास्तच वाढलेली आहे. अलीकडील काळात नांदेड जिल्ह्याच्या जलद विकासासाठी औद्योगिक विस्तार करण्यात येत आहेत आणि मुख्यत : नांदेड जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनामुळे रोजगार निर्मिती व त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. उद्योगधंद्यामध्ये किंवा इतर क्षेत्रात रोजगार मिळावा म्हणून स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांना चालना मिळाली. या सर्वांसाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासली व त्यामुळे स्वस्तात उपलब्ध असलेले मनुष्यबळ म्हणून बालक प्रथेला चालना मिळाली. स्थलांतर करून जी कुटुंबे शहरात आली ती प्रपंच चालवण्यास पुरेसा रोजगार न मिळाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाली. वाढलेले दारिद्र्य कमी करण्यासाठी व संसार स्थिर करण्याच्या धडपडीत त्यांनी लहान कोवळ्या वयात आपल्या मुलांना विविध व्यवसायात कामाला जुंपले. यामुळे नांदेड जिल्ह्यात कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालक समस्येने अतिशय भीषण रूप धारण केले व याच समस्येने कुटुंबाच्या समाजाच्या, राज्याच्या व पर्यायाने राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात अडथळा निर्माण केला आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी शासनाची, प्रशासनाची, स्वयंसेवी संस्थांची, राज्यकर्त्यांची समाजाची व संशोधनाची भूमिका महत्वपूर्ण असल्यामुळे प्रस्तुत विषयाचे महत्त्व अद्वितीय आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास खालील उद्दिष्टांच्या आधारे करण्यात आला आहे.

१) नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

२) नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अध्ययन करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

४) नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांवर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

५) नांदेड जिल्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या समस्येवर प्रतिबंधात्मक उपाय योजना सुचवणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :

१) कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या विविध आरोग्य विषयक समस्या असाव्यात.

२) कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असावी.

३) कचरा गोळा करणाऱ्या बालकांची शैक्षणिक स्थिती प्रतिकूल असावी.

४) कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या कामामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असावा.

संशोधन आराखडा : नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास या विषयाच्या संशोधनासाठी **शोधात्मक आणि**

वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येईल. तसेच संख्यात्मक व गुणात्मक आराखड्याचा वापर करण्यात येईल.

संशोधन विषय : नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास.

तथ्य संकलन : प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा वापर केला आहे.

प्राथमिक स्त्रोत :

कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या स्थितीचे अध्ययन करण्यासाठी मुलाखत अनुसूचीद्वारे (Interview Schedule) माहिती संकलित करण्यात येईल.

दुय्यम स्रोत :

संशोधन विषयाचे अध्ययन करताना दुय्यम साधन सामुग्रीमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, बालकविषयक प्रकाशित शासकीय अहवाल, अप्रकाशित शोधप्रबंध, बालक कायदे, वर्तमानपत्रे, संशोधनासंबंधी लेख आणि अधिकृत संकेतस्थळांवरील उपलब्ध माहितीचा वापर करण्यात येईल.

सांख्यिकीय तंत्र : उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी व आलेख इत्यादी सांख्यिकीय तंत्रांचा, संगणकाचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड :

नमुना क्षेत्र : नमुना निवड करताना प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालक यांची निवड करण्यात येईल.

निवड घटक :

नमुना निवड करताना प्रामुख्याने नांदेड जिल्यातील तीन तालुक्यांची निवड सहेतुक पद्धतीचा वापर करून करण्यात येईल. नांदेड जिल्यातील सोळा तालुक्यापैकी नांदेड अर्धापूर आणि मुदखेड या तालुक्यांची निवड करण्यात येईल. नांदेड जिल्यातील तीन तालुक्यातील प्रत्येकी ५० कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालक असे एकूण १५० उत्तरदात्यांची निवड करण्यात येईल.

नमुना निवड तंत्रे :

नांदेड जिल्ह्यातील कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांची निश्चित आकडेवारी उपलब्द नसल्यामुळे सहेतुक नमुना निवड पद्धती चा वापर ' (Purposive Sampling Method) करून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे संशोधन विषयाची माहिती संकलित करण्यात येणार आहे. सदरील संशोधनासाठी काही निवडक महिलांची व्यष्टी अध्ययन पद्धतीने निवड करून तथ्य संकलित करण्यात येतील.

विषयाची व्याप्ती व मर्यादा : संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित असेल.

२) प्रस्तुत अभ्यास हा नांदेड जिल्ह्यातील नांदेड अर्धापूर आणि मुदखेड या तालुक्यातील महिला व बालकां पुरताच मर्यादित असेल.

३) सदरील विषयाची व्याप्ती फक्त कचरा गोळा करणाऱ्या बालकामगारांच्या आरोग्य विषयक समस्ये च्या स्थितीच्या अभ्यासापुरतीच मर्यादित असेल.

४) सदरील विषयाची व्याप्ती फक्त कचरा गोळा करणाऱ्या महिला व बालकांच्या समस्येच्या, स्थितीच्या अभ्यास पुरतीच मर्यादित असेल.

५) प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाचा कालावधी हा सन २०२१ ते २०२६ या दरम्यानचा असेल.

संशोधनाची नैतिकता :

प्रस्तुत समाजकार्य संशोधनात संशोधक स्वतः उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीत भरून घेणार आहे . तसेच सहभागी निरीक्षण पद्धतीचा वापर करणार आहे आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून वास्तविक तथ्य गोळा करणार आहे . त्यामुळे वस्तुनिष्ठ तथ्य गोळा होतील आणि ताण विरहित परिस्थितीत उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचीत भरली जाणार आहे . त्याचप्रमाणे या संशोधनात असणाऱ्या अपत्यांची व त्यांची पालकांच्या माहितीसंदर्भात गुप्ततेचे तत्व पाळले जाणार असल्याने संशोधनात नैतिकता पाळली जाणार आहे .

संशोधन साहित्याचा आढावा:

कॅरीन ॲस्ट्रीड सिगमन (२००८) ' यांनी ' Weakest Link In The Textile Chain Pakistani Cotton Picker's Bitter Harvest या विषयावर निबंध लिखाण केले आहे केला आहे . हा निबंध असे दिर्शवितो की , पाकिस्तानात दरवर्षी एक लाख कापूस हा महिला व मुलींकडून हाताने काढला जातो . पाकिस्तानाच्या अर्थव्यवस्थेत सुस्पष्ट असे योगदान आपणास या महिलांचे पाहावयास मिळते . परंतु या महिलांच्या बाबतीत दैनिक बातम्यात व शैक्षणिक संशोधनात दुर्लक्ष नाले आहे . अशा महत्वाच्या बाबींवर प्रकाश टाकण्याचे काम लेखकाने केलेले आहे . YACEO हा लेख त्यांच्या कामाच्या स्वरूपाबद्दल , वेतन , व्यावसायिक सुरक्षितता आणि आरोग्य याबाबतीत स्पष्टीकरण करणारा आहे .

उपेंद्रनाथ सी (२००८) यांनी Isabelle Guerin and Jane Palier , Microfinance Challenges : Empowerment or Disempowerment of the Poor Section शोधनिबंध प्रकाशित केला आहे . या शोधनिबंधात त्यांनी दाखवून दिले आहे की , अल्प पतपुरवठा ही वेगवेगळ्या आर्थिक सेवा पुरवित आहे . या सेवा मुख्यत्वेकरून गरीबी, नष्ट करणे, गरीबी कमी

करणे व महिला सशक्तीकरण हा आहे . ही योजना गरीबांसाठी अमलात आणण्यास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते . पण यात बिगर सरकारी संघटना व शासन यांच दान आहे . या लेखातून अल्प पतपुरवठ्याचा संपूर्ण जगभर कसा प्रचार नाला ते बघावयास मिळते . २००४ साली फ्रान्समध्ये झालेल्या एका परिषदेत यावर विचार विनिमय केला आहे . त्या परिषदेनंतर २००४ गतिक अल्प पतपुरवठा वर्ष म्हणून घोषित केले आहे . अल्प पतपुरवठा बाबत अत्यंत सखोल अभ्यास या परिषदेत करण्यात आला आहे .

घनाथ देसाई (२००८) यांनी योजना मासिकात लिहिलेल्या बालकामगार : समस्या आणि उपाय " या लेखात भारतातील बालकामगारांच्या समस्या अभ्यासणे व त्या सोडविण्यासाठी उपाययोजना करणे या शोधनिबंधामध्ये त्यांनी भारतातील बालकामगारांची समस्या गुंतागुंतीची आहे असे म्हटले आहे . बालकांना अयोग्य वयात अयोग्य काम दिले जाते . विकसित देशांनी ही प्रथम ही चूक केलेली . आपण मुलांना काम आणि शिक्षण तसेच ते ज्या परिस्थितीत काम करतात त्याबाबतचे पर्याय उपलब्ध करून देवू शकतो काय ? परंतु सुदैवाने तसे होत नाही . बालकांचे शोषण रोखण्यासाठी कायद्यात नियमालावी राबवल्या आहेत . परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही . बालकामगार समस्येचे उत्तर सोपे नाही कारण ते अवैध किंवा अगदी अनैतिक आहे . स्वाभाविकपणे मुलांना काम करावे लाग काम केले नाही तर त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल हेही खरे.

हान अर्जन डी (२०११) उदारीकरण काळात यांनी कामगार स्थलांतर आण गरीबी यांचा असणारा सर्वसमावेशक विकास या विषयावर अभ्यास केला आहे . या अभ्यासातून त्यांनी विशद केले आहे की , भारतात कामगार स्थलांतर आणि गरीबी यामुळे विकासात असमानता आढळते . सन २००४ पासून रोजगार आणि रोजगाराची निर्मिती या पध्दतीमध्ये बदल नालेला आहे . जागतिक आर्थिक संकटाचा परिणाम झालेला दिसून येत आहे . हा संशोधन लेख

समाजातील गरीब कामगार स्थलांतराच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करतो . गरीबीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्थलांतर हाच असलेला दिसून येतो .

दीप मुखर्जी (2012) यांनी " स्त्रियांचा कामाच्या ठिकाणातील सहभाग : स्थान , विरोधाभास आणि वैविध्य " याचा अभ्यास केला आहे . हा निबंध असे दर्शवितो की कामाचे परंपरेने सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म अशा भागात विभागलेले असत कामाच्या अनौपचारिक व्याख्येने होते की ज्यामध्ये मुख्यत्वेकरून स्त्रिया करत असलेल्या कामाचा समावेश होत नाही . त्याचबरोबर अतिशय कमी प्रमाणात काम करणा - या स्त्रियांच्या कृतपणे उपलब्ध आहे . कामाचे जे काही दृश्य स्वरूप उपलब्ध आहे . ते ही स्त्रियांच्या बाबतीत भेदभावाचेच आहे . त्यात वेतन व काम या दोनही बाबींचा समा आहे . या निबंधामध्ये भारतातील स्त्रियांचे कामाची त्यामध्ये त्यांचा असणारा सहभाग , कामाचा त्यांच्यावर येणारा दुप्पट ताण , कामाची विभागणी आणि कामाचे वेतन याचा समावेश केलेला आहे . हे पाठीमागच्या दोन दशकांचा मागोवा घेते . स्त्री कामगारांची भारतातील स्थिती ही आजही दयनीय आहे . लवचीक नाही आणि स्त्रियांना अतिशय तोकड्या काम किंवा स्वयंसहित कामात गुंतगक आहे त्यामध्ये कौशल्याचा समावेश नाही . आपण स्त्रियांना शिक्षण देणे व त्यांच्यातील कौशल्ये विकसीत करणे याला जितके महत्त्व देतो तितकेच महत्त्व त्यांच्या कामामध्ये व पिळवणूकीबद्दल सुधारणेलाही द्यायला दृष्टीकोनच स्त्रियांची कामाबद्दलची स्थिती बदलू शकतो.

Lal (2006), has extensively carried out a study in the urban areas where child labor exists both in the formal as well as informal sector enterprises, though its presence in the latter is more frequent. In small manufacturing enterprises, which are spread over wide locations and can ignore legal restrictions, the children often work along with their elder relatives and friends. They are possibly not paid directly but indirectly through a supplementary wage paid to the primary worker. The main

occupations where the children are employed in the urban sector are those, which don't require heavy labor.

A study conducted by **Mirza (2018),** on Drug addiction and Pornographic content is becoming a threat to childhood, 90% of respondents interviewed had once seen porn and started taking drugs. Drug addiction became common, and 92% of respondents stated that it was required as they worked in such a filthy environment in which they wanted something to get a kick as they could work with efficiency. Starting from marijuana to weed and smack, they identify new sources of drugs like thinner, solution, and whitener. There had been approximate 95.3% of respondents accepting that they watched porn once or twice or more than it, and this created a bad image of females.

प्रकरणाची रुपरेषा : प्रस्तुत संशोधन पुर्नत्वास नेण्यासाठी खालील प्रकारे प्रकरणाचे नियोजन करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व विषय प्रवेश

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : सारणी आणि तथ्यांचे विश्लेषण

प्रकरण चौथे : व्यष्टी अध्ययन पद्धतीन

प्रकरण पाचवे : निष्कर्ष, सारांश गृहीत कृंत्यांची पडताळणी, समाजकार्य प्रारूप व सूचना

<u>संदर्भ :</u>

१) तेलतुंबडे, आनंद (२००७). २१ व्या शतकातील भारतासमोरील आव्हाने. मुंबई : लोकवाङ्मय गृह प्रकाशन. पृ.क्र. १.

2) भारती, दीपक (२०११). लोकसंख्या अध्ययन औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन. पृ.क्र. ५९.
3) महाराष्ट्र शासन. (२००८). बालमजुरी निर्मूलनार्थ माहिती पुस्तिका. मुंबई : कामगार आयुक्त कार्यालय. पृ.क्र. ८३.
4) बारबोले, टी. एल. (२०१२). भारतातील बालक समस्या : एक विश्लेषणात्मक अध्ययन. अर्थविचार. १ (१). नांदेड : स्वप्नील ऑफसेट. पृ.क्र.३३
5) NCLP Society. (2008). Survey of Child Labour in Slums of Hyderabad. Hyderabad : Final Research Report. Center for Good Governance. P. 1.
6) भारत सरकार. (२००६). भारताचे संविधान. मुंबई : भारत सरकार. पृ.क्र. ४२.
7) उपरोक्त, महाराष्ट्र शासन. (२००८). पृ.क्र. २.
8) www.ilo.org.in/definition-child labour.com
9) www.unicef.org.in / child labour - definition.
10) www.unicef.org.in/ child labour - definition.
11) बालमजुरी विरोधी अभियान. (२००५). भारतातील बालमजुरी. नवी दिल्ली : प्रकाशन युनायटेड नेशन चिल्ड्रन्स फंड. पृ.क्र. २.
12) Rao, V. R. P. (1996). Child Labour in India. New Delhi : Central Board of Workers Booklet. P.3.
13) शिर्के, पी. ए. (१ ९९ ६). बालक प्रथा निर्मूलन. मुंबई : लोकवाङ्मय प्रकाशन. पृ.क्र. ३.
14) यशदा. (२००५). बालकविषयक साहित्य. पुणे : प्रकाशक रत्नाकर गायकवाड. पृ.क्र.९.
15) म्हस्के, राजकुमार (२००८). मराठवाड्यातील बालमजुरांचा औद्योगिक, आर्थिक व सामाजिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास. औरंगाबाद : अप्रकाशित शोधप्रबंध. सादर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. पृ.क्र. २३. २४) कित्ता, पृ.क्र. २३.

16) सावंत, सुभाष (२०० ९). बीड जिल्ह्यातील ऊसतोडणी व्यवसायातील बालश्रमिकांचा अभ्यास. औरंगाबाद : अप्रकाशित शोधप्रबंध. सादर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. पृ.क्र. २४.

17) Kulshreshtha, J. C. (1978). Indian Child Labour. New Delhi : Uppal Publishing House. P. 48.

18) युनिसेफ, आय. एस. ओ. (२००१). भारतातील बालमजुरांचा प्रश्न. मुंबई : बालक अहवाल. पृ.क्र.१७. ७४

19) घाटगे जयंत (१ ९९९). समकालीन भारतातील सामाजिक समस्या. कोल्हापूर : घाटगे प्रकाशन. पृ.क्र. २७८.

20) जोशी, अंजली (२००७). असंघटित क्षेत्रातील बालक समाजशास्त्रीय अभ्यास. औरंगाबाद : बा.ल. जोशी प्रकाशक. पृ.क्र. २६.

21) पाटील, बा.भा. (२००६), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. १६ ढगे, एस.के. व इतर (२०११), संशोधन पध्दती, के.एस. पब्लिकेशन, पुणे, २. पृ.क्र. १

22) बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.४५

23) घाटोळे, रा.ना. (२००३), समाजशास्त्रीय तत्त्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन ४.

24) नागपूर, पृ.क्र. ११ बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.४१

मार्गदर्शक

डॉ. प्रतिभा पी. लोखंडे.

जवाहरलाल नेहरू कॉलेज ऑफ सोशल वर्क,

संशोधक :

क्रांती विठ्ठलराव भाटापूरकर

सामाजिक शास्त्रे संकुल,

सिडको, नवीन नांदेड. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड